# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २०४-२२** **दिनांक ०६/०७/२०२२**

## पिडित कामगार पती-पत्नी यांना कुवैत येथे मदत मिळवून देवून त्यांना परत भारतात सुखरुप आणण्यात भरोसा सेलची कामगिरी.

तक्रारदार महिला नामे श्रीमती ज्योती पांडे यांनी भरोसा सेल (गुन्हे शाखा) भाईंदर पश्चिम येथे तक्रारी अर्ज देवून त्यामध्ये नमुद केले की, 'त्यांच्याकडे पुर्वी घरकाम करणारी महिला, वय ४० वर्षे हि तिचे पतीसोबत घरकाम करण्यासाठी एका कंपनीच्या एजंटच्या मार्फतीने कुवैत या देशामध्ये दिनांक ५ एप्रिल २०२२ रोजी गेलेले होते. सदर ठिकाणी कामाकरिता जातांना त्यांना कळविण्यात आले होते की, घरमालक यांचे घरामध्ये २ लहान मुलांना सांभाळणे, घराची साफसफाई करणे व जेवण बनवण्याचे काम आहे व त्या बदल्यात त्यांना प्रत्येकी ४०,०००/- रुपये पगार मिळणार, असे सांगितले होते परंतु पिडीत पती-पत्नी जेव्हा कुवैत येथील घरमालक नामे मोसाब अब्दुल्ला यांचे घरी गेले तेव्हा त्यांचे घरामध्ये ९ लहान मुलांना सांभाळून, ५ ते ६ खोल्या व हॉलची साफसफाई करुन दिवसभर जेवण बनवण्याचे काम करावे लागत होते. सकाळी ६ वाजल्यापासुन दुसऱ्या दिवशी पहाटे ०४.०० वाजेपर्यंत असे २२ तास त्यांना घरकाम करावे लागत होते. त्यामुळे पिडीत महिलेची मानसिक व शारिरीक प्रचंड त्रासामुळे तब्बेत खराब होवून तिला फिट आल्याने तेथील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. त्यावेळी पिडीत महिलेने यातील अर्जदार श्रीमती ज्योती पांडे यांना व्टिट करुन तिचे हॉस्पिटलमधील फोटो पाठवून तिला परत भारतात परत यायचे आहे परंतु त्यांचे कुवैतमधील मालक त्यांना घराबाहेर सोडत नसल्याचे व त्यांचा मोबाईल काढून घेवून त्यांना घरातच बंद करुन ठेवत असल्याचे सांगितले.

सेंट्रल आफ्रिका येथुन कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत भरोसा सेल, भाईंदर यांनी नुकतेच एका पिडीत महिलेची सोडवणूक करुन तिला परत सुखरुप भारतात आणल्याची वृत्तपत्रांमध्ये बातमी अर्जदार श्रीमती ज्योती पांडे यांनी वाचली होती त्यामुळे त्यांनी लागलीच भरोसा सेलकडे सदर घटनेच्या अनुषंगाने तक्रार केली होती.

भरोसा सेल येथे सदर महिलेची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सपोनि तेजश्री शिंदे यांनी लागलीच सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. अमोल मांडवे यांना सदर घटनेची हकिकत सांगितली. त्याकरिता कुवैत इंडियन ॲम्बसीला पत्रव्यवहार करुन त्यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, दोन्ही पती-

पत्नी यांनी काम करण्याबाबतचा करार केला असुन त्या कराराअन्वये ते कुवैत येथे घरकामास लागलेले आहेत. सदर करारानुसार त्यांना त्यांच्या कामाची वेळ पुर्ण करावीच लागेल मात्र पिडीत व्यक्ती स्वतःहून इंडियन ऍम्बसीमध्ये आले तरच ते त्यांना मदत करु शकतील . पिडीत महिलेच्या पतीचा सपोनि तेजश्री शिंदे यांचेशी संपर्क झाल्यानंतर तेजश्री शिंदे यांनी त्या दोघांनी इंडियन ॲम्बसीच्या ऑफिसमध्ये स्वतःहून जाण्याबाबत सांगितले. मात्र पिडीत व्यक्तींचा मालक त्यांना कोणत्याही परिस्थीतीमध्ये घराबाहेर निघू देत नसल्याने त्यांनी दिनांक २० जून २०२२ रोजी भाजीपाला आणण्याच्या बहाण्याने घरमालकाची नजर चुकवून घराबाहेर पडले व कुवेत इंडियन ऍम्बसीमध्ये गेले. इंडियन ऍम्बसीने त्यांना त्यांच्या सेंटरमध्ये ठेवले व दोन दिवसांनी कुवैत येथील लेबर कोर्टमध्ये हजर केले. मात्र कुवैत लेबर कोर्टामध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांचा मालक मोसाबा अब्दुल्ला याला कोर्टात हजर राहण्याचे समन्स काढण्यात आले. मोसाबा अब्दुल्ला याने लेबर कोर्टामध्ये पिडीत पती-पत्नी यांचे पासपोर्ट हजर केले. त्यावेळी लेबर कोर्टाने पिडीतांना दिनांक ०४/०७/२०२२ रोजीपर्यंत स्व-खर्चाने परत भारतात जाण्यास सांगितले मात्र ते जर परत जावू शकले नाही तर मालकाचा जबाब नोंद करुन केस पुढे चालवण्यात येईल असे कळविले. त्यामुळे पिडीतांचे तिकिट काढण्याबाबतची व इतर तांत्रीक बाबींची पुर्तता करण्याबाबत भरोसा सेलच्या अधिकारी व अंमलदार यांनी कार्यवाही करुन दि. ०५/०७/२०२२ रोजी सदर दाम्पत्यास कुवैतवरुन परत भारतात सुखरुप आणण्यात आले आहे.

घरकामाच्या मोबदल्यात चांगले पैसे मिळतील या अपेक्षेने भारतातून अनेकजण परदेशात जातात परंतु परदेशातील कायदे व प्रक्रिया माहित नसल्याने अनेक कामगार परदेशामध्ये अडकून पडतात. त्यामुळे परदेशात जाण्यापूर्वी सर्व शहनिशा करुन कायदे व प्रक्रिया समजून घेवूनच परदेशात जायला हवे.

वरील कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेल, भाईंदर कक्षाचे सपोनि/तेजश्री शिंदे, पोहवा/सचिन तांबवे, मपोहवा/समृध्दी भगत, मपोशि/आफ्रिन जुन्नैदी यांनी केली आहे.

......oooo.......